महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.९१६/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९.

<u>प्रस्तावना -</u>

१. लर्नर्स एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित विद्या व्हॅली वर्ल्ड स्कूल, सर्व्हे नं.२९/१/२, मारूंजी रोड, ता मुळशी, जि पुणे या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासननिर्णय-</u>

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत लर्नर्स एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित विद्या व्हॅली वर्ल्ड स्कूल, सर्व्हे नं.२९/१/२, मारूंजी रोड, ता मुळशी, जि पुणे या नवीन शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इयत्ता इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी बी एस ई) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ / सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) संथेने सदर प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरू केली नसल्याची संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरू केली असल्यास संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर शाळेकडून रूपये एक लक्ष इतका दंड वसूल करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवांनगी (इरादा पत्र) देण्यात येत आहेः-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>रद्दबातल</u> ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी.बी.एस.ई.

Scanned by CamScanner

मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढशाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जि प पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२, प्र.क्र.९१६/१९)

Scanned by CamScanner